**पर्यावरण विषयक कार्यक्रम**
**Call for Green Ideas**

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.२६/तां.क.३
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक: १६ मार्च, २०१३

वाचा : (१) या विभागाचा शासन निर्णय क्र.योजना-२००७/प्र. क्र.३४/तां.क.३, दिनांक ०३ ऑक्टोबर, २००७

(२) क्र. इएनव्ही-२०१३/प्र.क्र. २६/तां.क.३, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ रोजीचे सुकाणू समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :**

पर्यावरण संवर्धनार्थ राज्याच्या स्थानिक गरजा लक्षात घेवून लोकसहभागातून नाविन्यपूर्ण कार्यक्रम पर्यावरण विभागामार्फत सन २०१०-२०११ पासून राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सादर बहुतांश प्रस्ताव हे होळी या सणाशी संबंधित असून व होळी हा उत्सव सन-२०१३ मध्ये मार्च महिन्यात येत असल्याचे लक्षात घेवून दिनांक २२.०२.२०१३ रोजी या कार्यक्रमासाठी गठित सुकाणू समितीची विशेष बैठक पार पाडली. या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्राप्त प्रस्तावांपैकी सुयोग्य प्रस्ताव निवडून त्यांना निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

लोकसहभागातून पर्यावरण संवर्धनार्थ नाविन्यपूर्ण कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्राप्त नऊ प्रस्तावांमधून खालील प्रस्तावांना सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात मंजूर व वितरीत करावयाचा निधी खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | योजनेचा संक्षिप्त तपशिल | मंजूर निधी |
|---|---|---|
| ०१ | **प्लास्टिक पिशवी हटाव, देश बचाव अभियान:** राज्याचे मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री व इतर मान्यवर यांच्यामार्फत प्लास्टीक पिशव्याऐवजी जूट बॅग वापराबाबत जनजागृती. | रु. ७.००/- लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ०२ | **पर्यावरणपूरक होळीचा ध्वनीमुद्रीत संदेश मोबाईलधारकांना पाठविणे:-** तीस सेंकदाचा मा. मुख्यमंत्री महोदयांचा ध्वनीमुद्रीत संदेश राज्यातील एक कोटी नागरीकांपर्यत मोबाईलद्वारे पोहचवून व्यापक जनजागृती करणे. | रु. ३५.००/- लक्ष |
| ०३ | **नैसर्गिक रंगांची होळी साजरी करणे:-** अंध शाळेतील विद्यार्थी, मुक बधीर व कर्णबधीर विद्यार्थी, यांच्यासाठी मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. मंत्री (पर्यावरण) व मा. राज्यमंत्री (पर्यावरण) यांच्या उपस्थितीत नैसर्गिक रंगांची होळी साजरी करणारा उपक्रम दुरचित्रवाहिन्याच्या सहकार्याने आयोजित करणे. व याची ध्वनीमुद्रीत प्रसारण होळीच्या दिवशी त्या वाहिनीवरुन प्रसारीत करणे. | रु. ७.००/- लक्ष |
| ०४ | **पर्यावरणपूरक होळी साजरी करा:-** राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर होळी उत्सवात पाण्याचा वापर जास्त प्रमाणात करु नका असा संदेश मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री यांचा व्हीडीयो संदेश ध्वनीचित्र मुद्रण करणे व राज्यातील २२५ डिजीटल सिनेमा थिएटर्समधून, दुरचित्रवाहिन्यावरुन तसेच रेडियो वाहिन्यांवरुन होळीपूर्वी दहा दिवस अगोदर प्रसारीत करणे. | रु. २५.००/- लक्ष |

२. उपरोक्त निवड झालेल्या प्रस्तावांसाठी लागणारा एकूण खर्च रू. ७४.०० लक्ष (रूपये चौऱ्हयात्तर लक्ष फ़क्त) एवढा आहे. सदर खर्चास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे. सुकाणू समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सदर खर्च हा ८०:२० अशा हिस्स्यात करावयाचा आहे. त्यानुसार एकूण मंजूर रू. ७४.०० लक्ष (रूपये चौऱ्हयात्तर लक्ष फ़क्त) पैकी राज्य हिस्सा म्हणून रु. ५९.२० लक्ष (रुपये एकोणसाठ लक्ष वीस हजार फक्त) व महाराष्ट्र नियंत्रण मंडळ यांचा हिस्सा म्हणून रु. १४.८० लक्ष (रुपये चौदा लक्ष ऐंशी हजार फक्त) एवढी रक्कम उपलब्ध करुन द्यावयाची आहे.

होळी हा सण मार्च महिन्यात साजरा करावयाचा असल्याने महाराष्ट्र नियंत्रण मंडळास राज्य हिस्सा म्हणून मुक्त करावयाची संपूर्ण रक्कम **रु. ५९.२० लक्ष (रुपये एकोणसाठ लक्ष वीस हजार फक्त)** या शासन निर्णयाद्वारे मुक्त करण्यास सोबतच्या सहपत्रातील अटी व शर्तीच्या अधिन राहून या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

३. **यासाठी अवर सचिव, पर्यावरण विभाग (Under Secretary, Environment Department) यांचे नांवे रु. ५९.२० लक्ष (रुपये एकोणसाठ लक्ष वीस हजार फक्त) एवढया निधीचा धनादेश काढण्यात यावा व त्यानुसार सदर रक्कम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना स्वतंत्ररित्या धनादेशाद्वारे अदा करण्यात यावी.**

४. सदर होणारा खर्च हा, क्र.यू-३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण, ०४, प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण १०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०२) पर्यावरण प्रतिबंध (०२)(१३) पर्यावरणविषयक जनजागृती, शिक्षण व वातावरण बदल कृती योजना (३४३५ १३०२) ३१, सहायक अनुदान, या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०१२-१३ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सन २०१२-१३ या वर्षात सदर

लेखाशिर्षाखाली एकूण रू.३०५.०० लक्ष एवढी तरतूद मंजूर व अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

५. उपरोक्त अदा करावयाचे रु. ५९.२० लक्ष (रुपये एकोणसाठ लक्ष वीस हजार फक्त) अधिदान व लेखाअधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून संबंधितांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री. दे. के. मानकर, अवर सचिव, पर्यावरण विभाग व नियंत्रण अधिकारी म्हणून श्री. सो.ना.बागुल, उपसचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना वितरित करावयाचे एकुण रु. ५९.२० लक्ष (रुपये एकोणसाठ लक्ष वीस हजार फक्त), अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून एकत्रित धनादेशाद्वारे वितरीत करण्यासाठी प्राप्त करण्याची कार्यवाही करावी.

६. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१२१/१४६१, दिनांक ६ मार्च, २०१३ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ८४/१३/व्यय-१६, दिनंक १६ मार्च, २०१३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१३०३१६१२३९५६७७०४ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार,

(दे. के. मानकर)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत -

१. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
२. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई
३. मा. मंत्री यांचे स्वीय सहायक,
४. मा. राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
५. उप सचिव (वित्त विभाग/व्यय-१६) मंत्रालय, मुंबई
६. उप सचिव (नियोजन विभाक/कार्या-१४६१), मंत्रालय, मुंबई
७. जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई.
८. सचिव पर्यावरण यांचे स्वीय सहायक
९. सर्व कार्यासने, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. रोख शाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा) महा.१, महा-२, मुंबई/नागपूर
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबइ
१३. निवड नस्ती / तां.क. ३

## पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/प्र.क्र.२६ /तां.क.३
## दिनांक: २२ फेब्रुवारी, २०१३ चे सहपत्र

पर्यावरण विभाग, पत्र क्र. इएनव्ही-२०१३/प्र.क्र. २६ /तां.क ३, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ नुसार निवड प्राप्त महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या प्रस्तावावरील सुकाणू समितीच्या निर्णयानुसार राबविण्याच्या कार्यक्रमाबाबतच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे-

अ) आपण सादर केलेल्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आपणास मंजूर रु. ७४.०० लक्ष निधी व त्यात आपला २० टक्के भार म्हणजेच रु. १४.८० लक्ष निधी एवढया एकूण खर्चाचा तपशिल तात्काळ सादर करायच्या अटीसह मंजूर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आपणास मंजूर निधी मुक्त करण्यात येत आहे.

ब) मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री यांचा पर्यावरणपूरक होळी संबंधी व्हीडीयो संदेश तसेच मोबाईल संदेश मुद्रीत व प्रसारीत करण्याबाबतचा तपशिल विभागास सादर करावा.

क) प्लास्टिक पिशवी हटाव, देश बचाव अभियान या प्रस्तावांतर्गत कार्यक्रम अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर मान्यवराकडून सोयीचा दिनांक व वेळ प्राप्त करुन राबविण्यात यावा व सदर बाबतचा सविस्तर तपशिल विभागास सादर करावा.

ड) अंध, मुकबधीर व कर्णबधीर शाळेतील विद्यार्थी, यांच्यासाठी नैसर्गिक रंगांची होळी साजरी करणारा उपक्रमाबाबतचा तपशिल विभागास सादर करावा. तसेच उपरोक्त कार्यक्रम विहित वेळेत पूर्ण होतील याची विशेष खबरदारी घ्यावी.

इ) प्रसारमाध्यमांची निवड करतांना तुलनात्मक दर व जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचण्याची क्षमता या निकषांवर करण्यात यावी

ई) प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी आपण **" पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन पुरस्कृत योजना"** असे दर्शनी भागावर ठळक अक्षरात फलक लावणे अथवा प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. त्याबाबत फोटो दिनांक व वेळ प्रदर्शित होईल यांची दक्षता घेवून शासनाकडे पाठविणे आवश्यक राहिल.

फ) उपरोक्त सर्व प्रस्तावांबाबतचा अंतिम माहिती जसे मोबाईल संदेश, व्हीडीयो संदेश व प्लास्टिक पिशवी हटाव, देश बचाव अभियानाचा व्हिडीयो मुद्रित प्रत विभागास सादर करावी. योजनेच्या अंमलबजावणीत पर्यावरण विभागास काही त्रुटी आढळल्यास त्यानुरुप आवश्यक ती कार्यवाही करणे तसेच आपल्यास मंजूर केलेली योजना रद्द करण्याचा पूर्ण अधिकार पर्यावरण विभागाकडे असेल.

ग) उपरोक्त कार्यक्रमांच्या अनुषंगाने काही न्यायालयीन वा अन्य कायदेशीर बाबी उद्‌भवल्यास सदर बाबी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत हाताळण्यात येतील.

घ) योजनांच्या अंमलबजावणीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र आपण विहित प्रारुपानुसार सादर करणे आवश्यक असेल **(" विवरणपत्र - अ")**. तसेच योजना पूर्ण झाल्यावर त्याच्या यशस्वीपणाबद्दल अहवाल तसेच Completion Report देणे आवश्यक राहिल.

**(द. के. मानकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

## विवरण पत्र-अ

### Form of Utilization Certificate

| Sr.No. | Letter/Order No. Date | Amount |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | Total | |

Certified that out of **Rs.** /- **(Rs. only)** of Grant-in-aid sanctioned during the year in favour of

under Government letter/Order No. given in the margin and **Rs.** /-

**(Rupees** **only)** has been utilized for the purpose of for which it was sanctioned and that balance of **Rs** unutilized at the end of the year has been surrendered to Government (vide No. /- remaining

Dated ) / will beo adjusted towards the grants ङin-aid payable during the next year. Out of total incurred expenditure **Rs.** /- contributed by project implementer.

२. Certified that I have satisfied myself that the conditions on which the grants-in-aid was sanctioned have been duly fulfilled /are being fulfilled and that I have exercised the following checks to see that the money was actually utilized for the purpose for which it was sanctioned.

**Kinds of Checks Exercised**

१. **Physical Progress verification**
२. **Separate Account Maintained for the Projects.**
३.

**Project Implementer**
**(Name & Signature)**

**Chartered Accountant**
**(Signature & Seal)**